सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सेतू अभ्यासक्रम

(Bridge course)

## इयत्ता - तिसरी

### शैक्षणिक वर्ष २०२१ - २०२२

ज्ञानसेवा तु सफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

# सेतू अभ्यासक्रम (ब्रीज कोर्स) : इयत्ता तिसरी

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा.राहुल द्विवेदी**(भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी संपादक: **विकास गरड**,
  प्र.प्राचार्य, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ.प्रभाकर क्षीरसागर**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, गणित विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
  **वृषाली गायकवाड**
  अधिव्याख्याता, गणित विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
- संपादन सहाय्य : **वैशाली गाढवे ,भक्ती जोशी**
  विषय सहाय्यक,गणित विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र, पुणे.
- निर्मिती सदस्य :
  १. **वैशाली गाढवे ,** विषय सहाय्यक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे
  २. **सुनिता लहाने,** विषय सहाय्यक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती.
  ३. **रमेश राजाराम झिटे,** विषय सहाय्यक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे
  ४. **दत्तात्रय दादू पाटील,** सहशिक्षक, विद्यामंदिर नागाव, ता. करवीर, कोल्हापूर.
  ५. **प्रभाकर काकडे ,** मुख्याध्यापक, प्राथ.शाळा गाढे जळगाव, ता.जि.औरंगाबाद
  ६. **मिलिंद खिल्लारे** ,विषय साधनव्यक्ती , औरंगाबाद.

## विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.**

१. सेतू अभ्यासक्रम एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर तीन चाचण्यांचा समावेश आहे.
२. मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यासक्रम तुम्हाला मदत करणार आहे.
३. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा.
४. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतिपत्रिकांचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृतिपत्रिका स्वप्रयत्नाने सोडवाव्यात.
५. कृतिपत्रिका सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.
६. प्रत्येक कृतिपत्रिकेत दिलेला पाठ्यांश अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी व्हिडीओ लिंक दिल्या आहेत, त्यांचा उपयोग करून संकल्पना समजून घ्या.
७. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. शेवटी दिलेल्या उत्तरसूचीच्या मदतीने आपल्या उत्तरांची खात्री करा.
८. न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

**हा सेतू अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !**

## शिक्षक / पालकांसाठी सूचना

Covid-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात ही शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.**

१. सेतू अभ्यासक्रम एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
२. सेतू अभ्यासक्रम हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
३. सदर अभ्यासक्रम हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
४. सदर अभ्यासक्रमात घटक व उपघटकनिहाय कृतिपत्रिकांचा(वर्कशीट) समावेश आहे.कृतिपत्रिका या अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आल्या आहेत.
५. कृतिपत्रिका या सामान्यपणे सहा भागांत देलेल्या आहेत.इयत्तानिहाय त्यात थोडाफार फरक आढळून येईल.

पहिला भाग -अध्ययन निष्पत्ती- विद्यार्थी नेमके काय शिकणार आहे.
दुसरा भाग- थोड समजून घेऊ -संकल्पनांचे स्पष्टीकरण
तिसरा भाग - चला सराव करू - सरावासाठी उदाहरणे
चौथा भाग – सोडवून पाहू - विद्यार्थ्यांना संकल्पना समजली की नाही हे पाहण्यासाठी प्रश्न / कृती / स्वाध्याय.

पाचवा भाग - थोडी मदत - संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून व्हिडीओ लिंक, क़्यु आर कोड इत्यादीचा समावेश...

सहावा भाग - हे मला समजले – विद्यार्थ्यांनी स्वयंमूल्यांकन करावे यासाठी अध्ययन निष्पत्ती दर्शक विधाने.

६. मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतीलपाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा अभ्यासक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

७. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यासक्रम दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.

८. विद्यार्थी प्रत्येक कृतिपत्रिका(वर्कशीट) स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मदत करावी.

९. निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.

१०.चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | दिवस क्रमांक | घटक |
|---|---|---|
| १ | १ | भौमितिक आकार |
| २ | २ | भौमितिक आकार |
| ३ | ३ | गमंत रेषेची |
| ४ | ४ | दैनंदिन व्यवहारातील विविध वस्तू वापरून आकृत्या काढण्याचा सराव करणे. |
| ५ | ५ | संख्यांची ओळख. |
| ६ | ६ | दशकाची ओळख. |
| ७ | ७ | वस्तू मोजून संख्या वाचन करणे. |
| ८ | ८ | संख्या वाचून संख्येचे शाब्दिक नाव लिहिता येणे. |
| ९ | ९ | १० चे गट करणे, दशकाची ओळख |
| १० | १० | संख्येचा टप्पा ओळखणे व शोधणे. |
| ११ | ११ | संख्येचा टप्पा ओळखणे व शोधणे. ( सराव ) |
| १२ | १२ | टप्प्याने बेरीज ( तोंडी बेरीज पूर्व तयारी ) |
| १३ | १३ | शून्याची बेरीज व वजाबाकी करता येणे. |
| १४ | १४ | गोष्टीतील बेरीज - १ |
| १५ | १५ | वस्तूंच्या मदतीने वजाबाकी करणे. |
| १६ | १६ | **चाचणी क्रमांक - १** |
| १७ | १७ | वस्तूंच्या मदतीने वजाबाकी करणे. |
| १८ | १८ | वर्षातील महिन्यांची नावे. |
| १९ | १९ | संख्येचा लहान - मोठेपणा |
| २० | २० | लगतची, मागची व पुढची संख्या |
| २१ | २१ | चढता -उतरता क्रम |
| २२ | २२ | मूल्य व क्रमवाचक संख्यावाचन. |
| २३ | २३ | चित्राद्वारे क्रमवाचक संख्येचे वाचन. |
| २४ | २४ | हातच्याची बेरीज |
| २५ | २५ | दोन अंकी संख्येची हातच्याची बेरीज. |
| २६ | २६ | गोष्टीतील बेरीज |
| २७ | २७ | वजाबाकीसाठी दशक सुटा करणे. |
| २८ | २८ | वजबाकीवरील उदाहरणे. |
| २९ | २९ | टप्प्याने वजाबाकी ( तोंडी वजाबाकी पूर्व तयारी ) |
| ३० | ३० | वजाबाकी वरील सराव |
| ३१ | ३१ | नाणी आणि नोटा यांची ओळख. |
| ३२ | ३२ | **चाचणी क्रमांक - २** |
| ३३ | ३३ | लांबी मोजूया. |
| ३४ | ३४ | वजन करूया. |

| | | |
|---|---|---|
| ३५ | ३५ | धारकता मोजूया. |
| ३६ | ३६ | माहितीचे व्यवस्थापन |
| ३७ | ३७ | माहितीचे व्यवस्थापन : अनुमान काढणे. |
| ३८ | ३८ | माहितीचे व्यवस्थापन : अनुमान काढणे. |
| ३९ | ३९ | आकृतिबंध |
| ४० | ४० | गुणाकार पूर्व तयारी. |
| ४१ | ४१ | गुणाकार संबोध सराव |
| ४२ | ४२ | संख्यावरील क्रिया : पाढे तयार करणे. |
| ४३ | ४३ | संख्यावरील क्रिया : पाढे तयार करणे. |
| ४४ | ४४ | संख्यावरील क्रिया : पाढे तयार करणे. |
| ४५ | ४५ | **चाचणी क्रमांक - ३** |

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## गणित सेतू अभ्यासक्रम

इयत्ता - तिसरी

विद्यार्थ्याचे नाव - ........................................................ क्षेत्राचे नाव - भूमिती

घटकाचे नाव - भौमितिक आकार

उपघटक - चला शोधूया वेगवेगळे आकार दिवस - पहिला

### थोडे आठवूया

**दिलेल्या वस्तू व आकार यांची जोडी लाव.**



### अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला त्रिमितीय आकार आणि द्विमितीय आकार ओळखता येतात.

### थोडी उजळणी

१. घरात असलेल्या विविध वस्तू जमा कर. उदा. डबा,पेला, तवा,आईसक्रीमचे कोन, बॉटल, चेंडू, लसूण, पुस्तक, पेन, पेन्सिल, रिकामी काडेपेटी, टूथपेस्टचे खोके, मिठाईचे खोके, वीट, कंपासपेटी, मेंदीचा कोन, बेलणे, खेळण्यातील गाडीचे टायर, पैशाची नाणी इत्यादी.

२. या वस्तूंचे समान आकारानुसार गट तयार कर.

३. त्या आकाराचे नाव कोणते ते माहित करून लिही.

४. ते गट दादा किंवा ताईला,आई किंवा बाबा यांना दाखवून बरोबर आहे की नाही ते पहा.

**थोडी मदत**

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_312915940593926144186

**सोडवून पाहू...**

- घरी उपलब्ध असलेल्या गोष्टीमधून स्वत: शिकण्यास आव्हान देणे. तसेच घरातील मोठी बहीण किंवा भाऊ, आई वडील यांच्या मदतीने शिकता येईल असा स्वाध्याय देणे. नमुना उदाहरण :-
- घरी उपलब्ध असलेल्या भाज्यांच्या मदतीने मुलांना आकार शोधायला लावणे. तसेच घसरगुंडी तयार करून त्यावरून वस्तू सोडायला लावून निरीक्षण करायला सांगणे.

१. तुझ्या घरी असलेल्या भाज्यांची नावे सांग /लिही.

........................................................................................................................

२.चित्रात दिलेल्या भाज्या ओळख व त्यांचे निरीक्षण कर.



........................................................................................

३. सारख्या आकाराच्या भाज्या शोध व त्यांचे वेगवेगळे गट कर.

........................................................................................................................

४. चित्रात दिलेल्या आकारासारखी कोणती भाजी तुझ्याकडे आहे ते सांग/लिही.

........................................................................................................................

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

क्षेत्राचे नाव - भूमिती | घटकाचे नाव - भौमितिक आकार

उपघटक - चला हाताळूया भौमितिक आकार | दिवस - दुसरा

## थोडे आठवूया

१. या टेबलवर काही वस्तू ठेवल्या आहेत.त्या वस्तूंची नावे सांग.

..........................................................................

..........................................................................



## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला वस्तूंचे [घनाकृतींचे] तिच्या भौतिक गुणधर्मानुसार स्वतःच्या शब्दात वर्णन करता येते. उदा.चेंडू घरंगळतो, बॉक्स घसरतो.

## थोडी उजळणी

- तुझ्या घरातील व परिसरातील घरंगळणाऱ्या व घसरणाऱ्या वस्तूंची यादी कर.

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

## थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/collection/do_3128133251578593281288 4?contentId=do_3129160380531425281297

### शोधून पाहू...

- ❖ आता एक पुष्ठ किंवा लाकडी फळी, थर्माकोलची शीट यापैकी जे घरी असेल ते घे. त्याची घसरगुंडी तयार कर. म्हणजेच उतरती भिंतीला लावून ठेव. तू घरातील जमा केलेल्या वस्तू एक – एक करून या घसरगुंडीवरून सोड. निरीक्षण कर व वहीत लिही. कोणती वस्तू घसरत जाते आणि कोणती वस्तू घरंगळत जाते. वहीत लिहून झाल्यावर ताई किंवा दादाला दाखव.



.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

क्षेत्राचे नाव - भूमिती
उपघटक - सरळ रेषा व वक्ररेषा ओळखणे.

घटकाचे नाव - गंमत रेषेची
**दिवस - तिसरा**

## थोडे आठवूया

१. खाली दाखविल्याप्रमाणे कृती कर. जेंव्हा दोरा दोन हातात पकडून ताणला तर सरळ रेषा मिळते आणि दोरा ढिला सोडला तर वक्र रेषा मिळते.





२. दोऱ्याच्या एका टोकाला दगड बांध आणि खाली सोड, कोणती रेषा मिळते ते सांग.

३. सरळरेषा व वक्ररेषा यांचा वापर करून नक्षी किंवा रांगोळी काढ.

४. दोरी व रांगोळीच्या सहाय्याने सरळ रेषा काढ.

५. वहीवर वक्ररेषा काढून ताई किंवा दादाला दाखव.

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

- ✓ मला सरळ रेषा आणि वक्र रेषा ओळखता येतात.
- ✓ मला सरळ रेषा व वक्र रेषा मिळून छान रांगोळी काढता येत आहे.

## थोडी उजळणी



१) दिलेल्या चित्रात उभी रेषा, आडवी रेषा, तिरपी रेषा व वक्र रेषा दिसते काय ?

.......................................................................

२) हाताने उभी रेषा तिरपी रेषा व वक्र रेषा, आडवी रेषा, काढण्याचा सराव कर.

.......................................................................

थोडी मदत

- [https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_3128098362538803201130](https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_3128098362538803201130)

शोधून पाहू...

- ठिपक्यांची रांगोळी पाहून त्यात किती रेषा वक्र आणि किती रेषा सरळ आहेत ते निरीक्षण कर.



- खालील चित्राचे निरीक्षण कर त्यात वक्ररेषा आणि सरळरेषा किती ते लिही

वक्ररेषा ................................................ सरळरेषा ..............................................





- सोबतच्या चित्रातील हे  आकार ओळख व रंगव .

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

क्षेत्राचे नाव - भूमिती

घटकाचे नाव - भौमितिक आकार

उपघटक - चला ओळखूया भौमितिक आकृत्या

दिवस - चौथा

## थोडे आठवूया

१. कंपास, खोडरबर, वही, पुस्तक, वाटी अशा विविध वस्तू घे.

२. वस्तू ठेवून वस्तूभोवती खडूने/पेन्सिलने रेषा काढ.

३. तयार झालेला आकार ओळख.

४. खालील आकृत्यांतील त्रिकोण, वर्तुळ, आयत या आकारांना रिंगण कर.



## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला द्विमितीय आकार समजले व ओळखता येतात.

✓ आयत,चौरस,त्रिकोण,वर्तुळ हे आकार मला काढता येत आहेत.

## थोडी उजळणी

१. खाली दिलेल्या चित्रातील पताकांचा आकार ओळख व नाव लिही.



आकाराचे नाव - ......................................

२. खाली दिलेल्या चित्रातील आकाराला कडा व कोपरे किती ते निरीक्षण करून सांग.



कडा [ ]

कोपरे [ ]

३. वस्तू पाहून त्याचा आकार काढ. उदा डबा, बॉटल, पाण्याचीटाकी, खिडकी, दरवाजा व विदूषक टोपी इत्यादी.



४. कागदावर आयत, चौरस, त्रिकोण व वर्तुळ काढून घे. त्यांना रंग असतील तर रंगव.

५. घरच्या फरशीवर खडूने आकार काढून त्या आकारावर छोटे खडे/बिया/शेंगदाणे किंवा मणी ठेव.

**थोडी मदत**

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_3128996637237166081249

**शोधून पाहू...**

❖ त्रिकोण व वर्तुळ,चौरस, आयत हे आकार वापरून वेगवेगळ्या रचना कर.

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

## थोडे आठवूया

**मोजून अंक लिही.**



- चित्राला मोजून गोल करा. (गट करा ) 4 चेंडूला रिंगण ◯ कर.





सोबतच्या आकृतीत  किती गोल आहेत ? ☐

सोबतच्या आकृतीत किती चौकोन आहेत ? ☐



सर्व मला जमले ☐



मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान**

**घटकाचे नाव - मागील उजळणी**

**उपघटक - दशकाची ओळख**

**दिवस - सहावा**

## थोडे आठवूया

१० गोलांना रिंगण कर.



१० चे गट किती ? [ ]

राहिलेले गोल किती ? [ ]

एकूण गोल किती ? [ ]



१० त्रिकोणाना रिंगण कर.

१० चे गट किती ? [ ]

राहिलेले त्रिकोण किती ? [ ]

एकूण त्रिकोण किती ? [ ]

- एकूण ३२ मासे आहेत तर १० चे किती गट होतील ? [ ]

  किती मासे शिल्लक राहतील ? [ ]
- मणी माळेवर ३२ मणी दाखव. त्यात १० चे किती गट आहेत ? [ ]
- तुझ्या हाताच्या बोटांचा १० चा गट केला तर किती गट होतील ? [ ]
- बस मध्ये ४२ माणसे आहेत १०-१० चे गट केले तर किती गट होतील ? [ ]
- रु ची १५ नाणी आहेत तर १० रुपयांच्या किती नोटा होतील ? [ ]
- व १ रु. किती नाणे होतील ? [ ]

**क्षेत्राचे नाव -** संख्याज्ञान  **घटकाचे नाव -** संख्यांच्या जगात

**उपघटक -** वस्तू मोजून संख्या वाचता येणे.  **दिवस -** सातवा

## थोडे आठवूया

१. तुझ्या घरी असलेल्या विविध भांड्यांची संख्या माहित करून घे. प्रत्येकाने खाली दिलेल्या तक्त्यात तुमच्या घरी असलेल्या वस्तूंची संख्या लिहायची आहे. समजा जर तुमच्याकडे दिलेल्या तक्तातील वस्तू नसतील तर त्या रकान्यात काहीही लिहू नका. त्याव्यतिरिक्त दुसरी वस्तू असेल तर तिचे नाव लिहून किती आहेत ते लिहू शकता.

| वस्तू | किती आहेत |
|---|---|
| ताट | |
| वाटी | |
| पेला | |
| प्लेट | |
| डब्बे | |
| चमचे | |

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ संख्यांचे वाचन कसे करावे,वस्तू कशा मोजाव्या हे मला समजले.

## थोडी उजळणी

- आता एक खेळ खेळूया.
- यासाठी दोन किंवा तीन जण खेळणारे हवेत.
- खेळण्याची सोंगटी/गोटी/डाईस घे.
- एका खेळाडूने सोंगटी २ वेळा टाकायची.
- दोन वेळा जे अंक येतील त्यापासून तयार होणारी संख्या जर या तक्त्यात असेल तर त्या संख्येला फुली मारायची.
- म्हणजे तुम्ही ते घर जिंकलेले असेल. तुम्ही हा खेळ दोघांमध्ये ही खेळू शकता, एकाने संख्या वाचायची आणि दुसऱ्याने ती संख्या ओळखून दाखवायची. सर्वात जास्त संख्या जो ओळखेल तो विजेता असेन.

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | ४४ | २४ | १६ |
| ५६ | ३२ | १२ | ५६ |
| ६२ | ४२ | १४ | ५१ |
| ४३ | १३ | ५२ | ६४ |

थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/collection/do_312813325157859328128 84?contentId=do_3128098463931596801133

मोडवून पाहू...

१. या फुलपाखराच्या पंखांवर असलेल्या संख्या ओळख व वाच.




२. चित्रातील फुलपाखरांच्या पंखांवर तुला आवडतील त्या दोन अंकी दोन संख्या लिही.



३. तुझ्या घरी असलेल्या वाहनांच्या नंबर प्लेटवरील संख्या लिहून काढ, घरातील इलेक्ट्रिक मीटर मध्ये कोणते अंक दिसतात ते बाबा किंवा दादा यांच्या मदतीने शोधून काढ, घरातील टी.व्ही.च्या रिमोटवर असलेल्या अंकांपासून संख्या तयार कर.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान** **घटकाचे नाव - संख्या वाचू-लिहूया**

**उपघटक - संख्या ओळखून संख्येचे अक्षरी लेखन करता येणे.** **दिवस - आठवा**

## थोडे आठवूया

- तुझ्या घरातील सदस्यांची माहिती भर.

| माहिती | संख्या | अक्षरी लेखन |
|---|---|---|
| तुझ्या घरातील एकूण सदस्य संख्या | | |
| तुझ्या घरातील एकूण सदस्यांच्या हाताची संख्या | | |
| तुझ्या घरातील एकूण सदस्यांच्या हाताच्या बोटांची संख्या | | |
| तुझ्या घरातील एकूण सदस्यांच्या पायाच्या बोटांची संख्या | | |

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला संख्यांचे अक्षरी लेखन कसे करावे हे समजले.

## थोडी उजळणी

१. खालील रिकाम्या आकारात कोणत्या संख्या येतील ते सांग व पुढील रिकाम्या जागी त्या संख्यांचे अक्षरी लेखन कर.




..............................................................................................




..............................................................................................




..............................................................................................

२. रिकाम्या चौकटीत कोणती संख्या येईल याचा विचार कर.




३. दिलेल्या संख्येचे अक्षरी लेखन कर.




**थोडी मदत**

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_3129003578375290881466

**शोधून पाहू...**

१. फुलपाखरांच्या पंखांवर असलेल्या संख्यांच्या अंकांतून तुला आणखी दोन अंकी किती संख्या बनविता येतील, एक अंक एकदाच उपयोगात आणता येईल.




.................................................................................................

.................................................................................................

२. दिलेल्या अंकांपासून दोन अंकी संख्या तयार कर. अट फक्त एकच आहे कि एक अंक एकदाच उपयोगात आण.

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ३ | ० | ८ |

.................................................................

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

**क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान** **घटकाचे नाव - गट करून मोजणी,चित्रात दाखवलेली संख्या**

**उपघटक - १०,१० चे गट करणे, १०चा एक गठ्ठा बांधणे म्हणजेच दशक बांधणी करणे, दहा व दशक या घराची ओळख.** **दिवस - नववा**

## थोडे आठवूया

१. नाणी व नोटा, काड्या आईसक्रिमच्या, बिया, चौकट वही, मणी, शेंगदाणे, फुटाणे
[१ रुपयाची नाणी खरी किंवा खोटी ही चालतील.]
यापैकी जे जे साहित्य घरात असेल ते घे आणि मोजून काढ. नंतर त्याचे १० चे गट कर.
ते गट मोजून घे आणि लिहून ठेव .दहाचे गट व उरलेले सुटे साहित्य किती याची नोंद वहीत कर .

२. कोणत्या क्रमांकाच्या चित्रातील काड्या मोजणे सोपे जाईल? आणि का ?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................




३. चित्रातील वस्तू मोज. १० चे किती गट होतील ते लिही तसेच किती उरतील ते लिही.



१० चे गट = ☐

किती उरतील = ☐



१० चे गट = ☐

किती उरतील = ☐



१० चे गट = ☐

किती उरतील = ☐



१० चे गट = ☐

किती उरतील = ☐

### अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला दोन अंकी संख्या ओळखता येते. दशक बांधता येतो.१० चा एक गठ्ठा म्हणजे एक दशक.

✓ मला ९९ पर्यंतच्या संख्यांचे वाचन व लेखन करता येते.

## थोडी उजळणी

१. चित्र पहा, बोटे मिळून एक १०.चित्रात दहा बोटे दाखविली आहेत
१० बोटे मिळून मुठ्ठी बनली आहे
तसेच १० एकक मिळून एक दशक तयार होतो.




२.चला आता आपण खेळ खेळूया.
ज्याप्रमाणे लुडो खेळतात त्याचप्रमाणे हा खेळ खेळायचा आहे.
फक्त जेव्हा तुम्हाला ६ चे दान पडते तेव्हा तुम्हाला परत खेळावे लागते.
त्यावेळेस जर तुम्हाला ४ चे दान पडले तर दोन्ही मिळून तुमचे १० होतील.
तेव्हा तुम्हाला दशकाचा बिल्ला मिळेल.
सर्वात जास्त जो दशकाचे बिल्ले मिळवेल तो खेळातील विजेता असेल.




३. खालील संख्या ओळख व लिही.







## थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_31290035908189388811059

## सोडवून पाहू...

१. चित्रातील संख्या ओळख व दशक व एकक रुपात मांडणी कर.

| दशक | एकक |
|---|---|
| | |
| | |
| | |



२. कोणतीही एक संख्या घेऊन दशक व एकक रुपात मांडणी कर.

| दशक | एकक |
|---|---|
| | |
| | |
| | |

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचे नाव - बेरीज**

**उपघटक - बेरजेची गंमत, बेरीज पुढे मोजून** **दिवस - दहावा**



## थोडे आठवूया

- ९ एकक (सुटे) घ्या. त्यासाठी तुम्ही मणी, बटण किंवा एकसारख्या आकाराचे बारीक खडे घेवू शकता.

- एका झाडावर ३ चिमण्या बसल्या होत्या. थोड्या वेळाने आणखी २ चिमण्या येवून बसल्या. आता झाडावर एकूण किती चिमण्या आहेत ?
- हे उदाहरण मणी मांडून सोडवून पाहूया.
- ३ मणी (३ चिमण्या) आणि २ मणी (२ चिमण्या) मिळून एकूण होतील ५ मणी म्हणजेच ३ चिमण्या आणि २ चिमण्या मिळून झाल्या ५ चिमण्या.

चित्रात पाहा.
३ चिमण्या आणि अजून २चिमण्या मिळून होतील एकूण ५ चिमण्या



- आता पुढील उदाहरण पाहा.
- ४ सुटे घ्या. आता ३ सुटे हातात घ्या. ४ पासून पुढे एक एक सुटा ठेवत मोजा.
- जसे- ५,६,७...
- याप्रमाणे ४ पासून ३ घरे पुढे मोजल्यास मिळतील ७.
- ४ + ३ = ७ ही मांडणी पाटीवर करा.

- आता एक दोरी व काही चिमटे घ्या.
- दोरीवर अगोदर ५ चिमटे लावा व सांगा -
- " दोरीवर किती चिमटे लावले आहेत ?"
- मोज व सांग. - ५ चिमटे लावले आहेत.
- ५च्या पुढे एक - एक ने मोजत दोरीवर आणखी ३चिमटे लाव. असे करताना ५च्या पुढे मोजा - जसे- ६,७,८...

५ + ३ = ८



## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला सोपी बेरीज करता येते.

✓ मला दिलेल्या संख्येच्या पुढे मोजून बेरीज करता येते.

### थोडी उजळणी

चला आपण ४ + ५ ही बेरीज संख्यारेषेवर पुढे मोजून करूया.




या संख्यारेषेवर ४ पासून पुढे ५ पाऊले मोजूया.




४ पासून पुढे ५घरे मोजल्यास ९येतात म्हणून ४ + ५ = ९

### थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_3130139846207078401221

### सोडवून पाहू...

- घरातील कॅलेंडर घे. त्यामधील कोणत्याही एक महिना निवड.
  त्यामध्ये खाली सांगितल्याप्रमाणे कृती कर आणि समोर उत्तर लिही.
- ५ तारखेपासून ६दिवस पुढे मोज. आलेली तारीख - ...................................
- १२ तारखेपासून ४ दिवस पुढे मोज. येणारी तारीख - ...................................
- २० तारखेपासून किती दिवस पुढे गेल्यावर २७ तारीख येईल ? ...................................

❖ **मोजून बेरीज कर.**

(१) १२ + ६= ☐　　(२) १४ + ८ = ☐　　(३) ६ + १३ = ☐

(४) १७ + ३ = ☐　　(५) ८ + ३ = ☐　　(६) ११ + ९= ☐

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचे नाव - बेरीज**

**उपघटक - बेरीज-बिनहातच्याची** **दिवस - अकरावा**

## थोडे आठवूया

- समीरने २२ झाडे लावली व रोहनने १२ झाडे लावली. दोघांनी मिळून एकूण किती झाडे लावली?
  हे उदाहरण करून पाहू.
- आता दोन पाट्या/ फरशाघ्या. त्यावर दशक व एककची घरे आखा. आता पहिल्या पाटीवर दशक दांडे व सुटे घेवून समीरची २२ ही संख्या तयार करा. तसेच दुस-या पाटीवर रोहनची १२ ही संख्या तयार करून पहिल्या पाटीच्या खाली ठेवा.
- आता एककच्या घरातील २ एकक व २ एकक एकत्र करतील. होतील ४ एकक. त्यानंतर दशक घरातील २ दशक दांडे व एक दशक दांडा एकत्र करून ३ दशक दांडे तिस-या उत्तर पाटीवर/फरशीवर ठेवा.
- हेच उदाहरण मणी किंवा नोटांची प्रतिके वापरून करून पाहा.




### अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला हातचा न घेता बेरीज करता येते.

✓ उपलब्ध वस्तू आणि चित्रे वापरून मी बेरीज करू शकतो.

### थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_3130007661660815361228

### सोडवून पाहू...

खालील उदाहरणे मणी वापरून करून बघ .

- ८ मध्ये ० मिळवले किती होतील ? ☐
- एका झाडावर ३ चिमण्या होत्या. आता त्या झाडावर ० चिमण्या आल्या. तर आता झाडावर एकूण किती चिमण्या आहेत ? ☐
- एका माणसाजवळ ८५ रुपये होते.त्याला ० रुपये मिळाले. तर आता त्याच्याकडे एकूण किती रुपये झाले ? ☐

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

क्षेत्राचेनाव - संख्यांवरील क्रिया

घटकाचे नाव - बेरीज

उपघटक - टप्प्याने बेरीज ( तोंडी बेरीज पूर्व तयारी )

दिवस - बारावा



## थोडे आठवूया

| | |
|---|---|
| १ | ० |
| + | ४ |
| | |

| | |
|---|---|
| २ | ० |
| + | ७ |
| | |

| | |
|---|---|
| ३ | ० |
| + | ५ |
| | |

| | |
|---|---|
| १ | ० |
| + | ६ |
| | |

| | |
|---|---|
| | ८ |
| + | ५ |
| १ | ३ |






## सोडवून पाहू...

| | |
|---|---|
| | ७ |
| + | ८ |
| | |




| | |
|---|---|
| | ६ |
| + | ७ |
| | |




| | |
|---|---|
| | ९ |
| + | ४ |
| | |



| | |
|---|---|
| | ७ |
| + | ५ |
| | |




| | |
|---|---|
| | ६ |
| + | ८ |
| | |




**थोडी मदत**

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_31290036259300147211063

**सोडवून पाहू...**

१. ५ आणि ६ किती =

२. ४ आणि ८ किती =

३. ६ आणि ४ किती =

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

**क्षेत्राचे नाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचे नाव - बेरीज आणि वजाबाकी**

**उपघटक - शून्याची बेरीज आणि वजाबाकी** **दिवस - तेरावा**

## थोडे आठवूया

१२ + ० =

- या उदाहरणात पाटीवर १२ ही संख्या दशक व एकक रुपात १ दशक दांडा व २ सुटे घेवून तयार करा. यामध्ये दुस-या पाटीवर ० लिहा.
- ० म्हणजे किती ? ( काहीच नाही )
- बरोबर मग पाटीवर ० म्हणजे कोणत्या वस्तू ठेवायच्या ? (कोणत्याच नाही)
- छान मग सांगा. १२ मध्ये काहीच नाही मिळवले तर कोणती संख्या मिळेल ?
- (१२ हीच संख्या मिळेल.)
- बरोबर… याचाच अर्थ एखाद्या संख्येत ० मिळवले तर संख्येत काहीच बदल होत नाही.

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ एखाद्या संख्येत शून्य मिळवणे/ शून्य काढून टाकणे म्हणजे काय हे मला समजते.

✓ गोष्टी, वस्तू आणि चित्रे यांच्या साहाय्याने मी शून्याची बेरीज व वजाबाकी करू शकतो.

## थोडी उजळणी

| | |
|---|---|
| १) १५ + ० = …….. | ४) १७ - ० = ……….. |
| २) २७ + ०= …….. | ५) ३५ - ० = …………. |
| ३) ५९ + ० = …….. | ६) ७२ - ० = …………. |

## थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_31290036259300147211063



**सोडवून पाहू...**

खालील उदाहरणे मणी वापरून करून पाहा.

- २८ मध्ये ० मिळवले किती होतील ?
- एका बरणीत १३ करंज्या होत्या. आईने त्यातील ० करंज्या बाहेर काढल्या तर आता बरणीत किती करंज्या आहेत ?
- एका माणसाजवळ ८५ रुपये होते.त्याला ० रुपये मिळाले. तर आता त्याच्याकडे एकूण किती रुपये झाले ?



**सर्व मला जमले** ☐



**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

**क्षेत्राचेनाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचेनाव – बेरीज**

**उपघटक - गोष्टीतील बेरीज - १** **दिवस - चौदावा**

## थोडे आठवूया

- मैदानावर ३ मुले खेळत होती. अजून २ मुले आली तर मैदानावर एकूण किती मुले झाली ?

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला हातचा न घेता बेरीज करता येते.

✓ मी उपलब्ध वस्तू आणि चित्रे वापरून मी बेरीज करू शकतो.

## थोडी उजळणी

- आईने कविताला डब्यात ठेवण्यासाठी २६ लाडू दिले. ताईने पुन्हा १२ लाडू दिले, तर कविताने एकूण किती लाडू डब्यात ठेवले ?

- गोष्टीच्या पुस्तकातील ३० पाने गौतमने काल वाचली. आज त्याने उरलेली ४९ पाने वाचली, तर ते पुस्तक किती पानांचे होते ?

### थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_3130007661660815361228

### सोडवून पाहू...

१. माईकडे १८ टिकल्या होत्या. सीमाकडे २१ टिकल्या होत्या, तर दोघींकडे मिळून एकूण किती टिकल्या होत्या ?

२. टोपलीत ३३ जांभळे होती. शाहिदने त्यात ५४ करवंदे ठेवली, आता टोपलीत एकूण किती फळे झाली ?

३. खेळण्याच्या दुकानातील बाहुल्यांपैकी ४२ बाहुल्या गीताने घेतल्या. दुकानात अजून ३७ बाहुल्या शिल्लक होत्या, तर दुकानात एकूण किती बाहुल्या होत्या ?

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचे नाव - वजाबाकीने कमी करूया**

**उपघटक - वस्तूंच्या मदतीने वजाबाकी करणे.** **दिवस - पंधरावा**

## थोडे आठवूया

- सोनूजवळ ५ रुपये आहेत. त्याने त्यातील २ रुपये खर्च केले. आता त्याच्याजवळ किती रुपये शिल्लक राहिले ?
  ५ सुटेघ्या. ५ सुट्यातून २ सुटे त्यातून काढून टाका. किती सुटे उरले ते सांग ?




पाटीवर सुटे ठेवून हे उदाहरण कर .सुटे ठेवत किती सुटे ठेवले ते लिही.

- ५ सुटे ठेवा व लिही ५
- त्यातून २ कमी करायचे आहेत म्हणून खाली २ लिही.
- कमी करायचे म्हणून वजाबाकीचे चिन्ह काढ.
- ५ मधून २ कमी केले की शिल्लक राहतात ३. हे ३खाली लिही..
- **(-) याला वजाबाकीचे चिन्ह म्हणतात.**

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला दिलेल्या वस्तूतून सांगितलेल्या वस्तू कमी करून वजाबाकी करता येते.

✓ मी उपलब्ध वस्तू आणि चित्रे वापरून मी वजाबाकी करू शकतो.

## थोडी उजळणी

**जोड्या लावून वजाबाकी.**

- आकाशकंदील ८ व पणत्या ४ आहेत. पणत्यांपेक्षा आकाशकंदील किती जास्त आहेत ?



$$\begin{array}{r} 8 \\ - \; 4 \\ \hline \boxed{4} \end{array}$$

(८ − ४ = ४)

पणत्यांपेक्षा ४ आकाशकंदील जास्त आहेत.

- ६ पाट्या व ११ पुस्तके आहेत, पुस्तकांपेक्षा पाट्या किती कमी आहेत ?



$$\begin{array}{r} \square \\ - \; \square \\ \hline \square \end{array}$$

पुस्तकांपेक्षा पाट्या ☐ कमी आहेत.

- ८ स्ट्रॉबेरी आणि ६ डाळिंबे आहेत. स्ट्रॉबेरी किती जास्त आहेत हे संख्यांची वजाबाकी करून ठरवू.

$$\begin{array}{r} 8 \\ - \; 6 \\ \hline \boxed{2} \end{array}$$

(८ − ६ = २)

म्हणून डाळिंबांपेक्षा २ स्ट्रॉबेरी जास्त आहेत,
किंवा स्ट्रॉबेरीपेक्षा २ डाळिंबे कमी आहेत.

थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_3130139850764533761213

## सोडवून पाहू...

चौकटी भरा.

९९ → १२, ८७

८७ + १२ = ९९

९९ − १२ = ८७    ९९ − ८७ = १२

८४ → ५०, ३४

३४ + ☐ = ☐

☐ − ☐ = ☐    ☐ − ☐ = ☐

७५ → ◯, ◯

☐ + ☐ = ☐

☐ − ☐ = ☐    ☐ − ☐ = ☐

यप्रमाणे एक उदाहरण तुम्ही तयार करा व सोडवा.

◯ → ◯, ◯

☐ + ☐ = ☐

☐ − ☐ = ☐    ☐ − ☐ = ☐

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**चाचणी क्रमांक १** **दिवस - सोळावा**

**विद्यार्थ्याचे नाव - ...............................................................** **गुण -१०**

१. खालीलपैकी कोणत्याही दोन संख्या वाच. गुण -१

| | |
|---|---|
| ९७ | ५४ |
| २९ | ३६ |

२. कोणत्याही एका आकाराचे नाव लिही. गुण -१



-------------------

३. या आकाराचे नाव ओळख व लिही. गुण-१



-------------------

४. संख्या अक्षरांत लिही.[कोणतीही एक] गुण-१

१) २४ ...........................

२) ४८...........................

५. १७ काड्या [ आईसक्रीमच्या/वाळलेल्या झाडाच्या] घे. १० चे किती गठ्ठे तयार होतील ते लिही. गुण-१

.....................................................................

६. चित्ररूपावरून संख्या कोणती ते लिही. गुण - १




७. संख्या वाच व तेवढ्या वस्तू दाखव .( दशक दांडे - सुटे,काड्यांचे गठ्ठे-सुटे ) गुण - १

१) ६३ ........................... २) ९१.............................

८.खालील संख्येतील स्थानिक किंमत ओळखून विस्तारित रुपात मांडणी कर. गुण - १

१) ७७ .......................................................२) ५० ......................................................

९. बेरीज कर. गुण - १

४५ + ३४ =

१०. वजाबाकी कर. गुण -१

२४ – ० =

**क्षेत्राचे नाव - संख्यांवरील क्रिया** **घटकाचेनाव - गोष्टीतील वजाबाकी**

**उपघटक - वस्तूंच्या मदतीने वजाबाकी करणे.** **दिवस - सतरावा**

## थोडे आठवूया

✓ बेडूकमामा २९ वर आहेत. त्याने १० ची एक मोठी उडी मागे मारली तर तो कोणत्या संख्येवर पोहचेल ?




- बेडूकमामा २५ वर आहेत. त्याने १० ची एक मोठी उडी मागे मारली तर तो कोणत्या संख्येवर पोहचेल ?




## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ गोष्ट ऐकून त्यानुसार वजाबाकी चित्ररुपात मांडता येते.

✓ गोष्टीतील वजाबाकी लक्षात घेवून वजाबाकी करता येते.

## थोडी उजळणी

१. रामने त्याच्याकडील ५६ गोळ्यांतील ३२ गोळ्या शामला दिल्या ,तर रामजवळ किती गोळ्या राहिल्या ?

२. मनूने ४३ जाईची फुले तर ६६ जुईची फुले आणली, तर जाईच्या फुलांपेक्षा जुईची फुले कितीने जास्त आहेत ?

थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_3130139855485829121201

सोडवून पाहू...

१) रोहनने १२पुस्तके वाचली व  सागरने २२ पुस्तके वाचली. तर सागरने रोहनपेक्षा किती जास्त पुस्तके वाचली ?

२) सीमाकडे १७ फुले आहेत. तर शामलकडे ११ फुले आहेत. शामलकडे सीमापेक्षा किती कमी फुले आहेत ?

३) प्रकाशने एका परीक्षेत ३२ गुण मिळवले आणि तेवढेच गुण जयदीपने मिळवले, तर कोणी जास्त गुण मिळवले ?

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

क्षेत्राचे नाव - मापन

घटकाचे नाव - वर्षाचे महिने बारा

उपघटक - वर्षांतील महिन्यांची नावे

दिवस - अठरावा

## थोडे आठवूया

- खालील चित्र पाहा व त्यानुसार सांगितलेली कृती कर.

- लाल रंगाच्या चांदणीतील महिन्यांची नावे सांगा.

  ..............................................................................................

- हिरव्या रंगाच्या चांदणीतील नावे कोणत्या महिन्याची आहेत ?

  ..............................................................................................

- ज्येष्ठ चांदणीने समोर यावे. सांग बरं तुझ्यानंतर कोणती चांदणी आहे ?

  ..............................................................................................

- सांग बरं निळ्या चांदणीतील पहिल्या महिन्याचे नाव काय ?

  ..............................................................................................

- माघ महिना कोणत्या महिन्यानंतर आला आहे ?

  ..............................................................................................

- शेवटच्या चांदणीतील महिना कोणता ?

  ..............................................................................................




- इंग्रजी महिने शिकवण्यासाठी वरीलप्रमाणेच ढगांच्या आकारात काळे व पांढरे कार्ड तयार करून कृती घेतील व प्रश्न विचारतील.

  - एकूण किती ढगांचे कार्ड आहेत ? ..............................................
  - काळ्या रंगाचे ढग असलेले किती कार्ड आहेत ? ...................................
  - काळ्या रंगाच्या ढगात पहिला महिना कोणता ? ....................................
  - काळ्या रंगाच्या ढगात शेवटचा महिना कोणता ? ..................................
  - पांढ-या रंगाच्या ढगात पहिला महिना कोणता ? ....................................
  - पांढ-या रंगाच्या ढगात शेवटचा महिना कोणता? ...................................
  - पांढ-या रंगाचे ढग असलेले किती कार्ड आहेत ? ..................................
  - जानेवारी नंतर कोणता महिना येतो ? ................................................



### अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ मला भारतीय सौर वर्षातील महिन्यांची नावे सांगता येतात.

✓ मला इंग्रजी वर्षातील महिन्यांची नावे सांगता येतात.

### थोडी उजळणी

❖ तुमच्या घरातील दिनदर्शिका (कॅलेंडर ) पाहून त्यातील महिन्यांची नावे व दिवसांची संख्या लिही ?

........................................................................................................................................

........................................................................................................................................

### थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/content/do_31300076479039897614

### सोडवून पाहू...

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी<br>३१ दिवस | फेब्रुवारी<br>२८ / २९ दिवस | मार्च<br>३१ दिवस | एप्रिल<br>३० दिवस | मे<br>३१ दिवस | जून<br>३० दिवस |
| जुलै<br>३१ दिवस | ऑगस्ट<br>३१ दिवस | सप्टेंबर<br>३० दिवस | ऑक्टोबर<br>३१ दिवस | नोव्हेंबर<br>३० दिवस | डिसेंबर<br>३१ दिवस |

- जानेवारीच्या फरशीवर उभा राहा. दोन फरशा पुढे जा. कोणत्या महिन्याच्या फरशीवर आला आहेस ? तो महिना किती दिवसांचा आहे ? ........................................................
- जानेवारी पासून जून महिन्याची फरशी कितवी आहे ? ..........................................
- जून मध्ये एकूण किती दिवस आहेत ? ..................................................

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान घटकाचे नाव - संख्येचा लहान-मोठेपणा

उपघटक - दोन अंकी संख्या लिहिताना आणि तुलना करताना स्थानिक किमतीचा उपयोग करतात.

दिवस - एकोणिसावा



**थोडे आठवूया**

**पुढील संख्येत दशक स्थानच्या अंकाला ◯ व एकक स्थानच्या अंकाला □ कर.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ४३ | ५० | २८ | ८२ | १६ | ६१ | २४ | ४२ | ०६ |

खाली दिलेल्या प्रत्येक चौकटीतील लहान संख्येला रिंगण ◯ कर.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ ,१९ | २३ , ३३ | ५१, ४५ | १० , २२ | ६७, ७९ |

खाली दिलेल्या प्रत्येक चौकटीतील मोठ्या संख्येला रिंगण ◯ कर.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४८, ८४ | ५६, ६५ | ९३, ३९ | २७, ७२ | ३८, ८३ |

❖ **संख्यांचा लहान - मोठेपणा ठरविण्यासाठी < , > या चिन्हांचा उपयोग करतात.**

**३ [ < ] ६ ( तीन लहान सहापेक्षा ) ६ [ > ] ३ ( सहा मोठे तीनपेक्षा )**

८ □ ५ १२ □ १६ ९ □ १४

❖ १७ व २३ या संख्यातील लहान - मोठेपणा ठरव.



- यात १७ रुपयात १० ची एक नोट आहे
- २३ मध्ये १० च्या दोन नोटा आहेत
- २३ मधील १० च्या नोटांची संख्या जास्त म्हणून २३ ही संख्या मोठी
- तर १७ रुपयात १० च्या नोटांची संख्या कमी म्हणून १७ ही संख्या लहान.
- दशक दांडे ,मणिमाळ यांचे चित्र घेणे.

| ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ ↓ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ ↓ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

१७ हे २३ च्या मागे म्हणून १७ लहान आहे. २३ हे १७ च्या पुढे म्हणून २३ मोठे आहे.

### अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ दोन अंकी संख्यांचा लहान-मोठेपणा ठरविताना त्या संख्यांतील दशक स्थानच्या अंकाचा विचार करावा लागतो.

✓ ज्या संख्येतील दशक स्थानचा अंक मोठा ती संख्या मोठी असते.

### थोडी उजळणी

❖ खाली दिलेल्या प्रत्येक जोडीतील लहान संख्येखालील चौकटीत √ अशी खूण करा.

१४ ☐ ३१ ☐    ४२ ☐ २८ ☐    ८१ ☐ ५४ ☐    ३६ ☐ ७२ ☐

❖ प्रत्येक जोडीतील मोठ्या संख्येला रिंगण ◯ कर.

१६ , ३०    ७६ , ७९    ६० , ८०    ५४ , ४५    ८२ , ९८

❖ दिलेल्या संख्येतील कोणती संख्या लहान आणि कोणती संख्या मोठी आहे ते ठरव.

१) ३२ व ४३ = ३२ मध्ये ....... दहाच्या नोटा व ४३ मध्ये ....... दहाच्या नोटा आहेत,
म्हणून ..........लहान आहे व ........... मोठे आहेत.

२) ६४ व ५५ = ६४ मध्ये .......... दहाच्या नोटा व ५५ मध्ये ........... दहाच्या नोटा आहेत,
म्हणून ............ लहान आहे व ............. मोठे आहेत.

थोडी मदत

- https://diksha.gov.in/play/collection/do_312813325157859328128847?contentId=do_3128098401745059841132

मोडवून पाहू...

❖ रिकाम्या चौकटीत < , > यांपैकी योग्य चिन्ह वापर.

- ३९ ☐ २३
- ६७ ☐ ९७
- ८२ ☐ १९

सर्व मला जमले ☐

मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन. ☐

**क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान** **घटकाचे नाव - संख्यांचा लहान - मोठेपणा**

**उपघटक - लगतची मागची व पुढची संख्या** **दिवस - विसावा**

## थोडे आठवूया

❖ **पुढील चौकटी पूर्ण कर.**

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | | ६ | | | ९ | | | | १३ | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | | | | | १४ | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | ९ | १० | ११ |

## अध्ययन निष्पत्ती/हे मला समजले.

✓ कोणत्याही संख्येच्या डावीकडची म्हणजे लगतची मागची संख्या १ ने कमी असते हे मला समजले.

✓ कोणत्याही संख्येच्या उजवीकडची म्हणजे लगतची पुढची संख्या १ ने जास्त असते हे मला समजले.

## थोडी उजळणी

❖ दिलेल्या संख्येच्या मागे एक उडी मारली की लगतची मागची व पुढे उडी मारली की लगतची पुढची संख्या मिळते.

- लगतची मागची व लगतची पुढची संख्या ओळख.

☐ २४ ☐

☐ ६७ ☐

☐ ९८ ☐

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ | ४९ | ५० | ५१ | ५२ | ५३ |

अ) ३५ च्या पुढे एक उडी मारली तर ...........वर जाशील आणि ३५ च्या मागे एक उडी मारली तर ..................... वर जाशील.

आ) ५२ च्या पुढे एक उडी मारली तर ....................वर जाशील आणि ५२ च्या मागे एक उडी मारली तर ...................... वर जाशील.

इ) ४४ च्या पुढे एक उडी मारली तर ....................वर जाशील आणि ४४ च्या मागे एक उडी मारली तर ...................... वर जाशील.

**थोडी मदत**

- https://diksha.gov.in/play/collection/do_31281332515785932812884?contentId=do_31280983803514060819898

**शोधून पाहू...**

१. सावीचा रांगेत ३२ वा क्रमांक आहे तिच्या पुढे लगत ओवी उभी आहे तर ओवीचा रांगेतील क्रमांक किती ? ☐

२. रस्त्याच्या कडेने लावलेल्या ४८ व्या झाडाच्या लगतच्या मागच्या झाडाचा क्रमांक किती ? ☐

**सर्व मला जमले** ☐

**मदत कोपऱ्याची अजून मदत घेईन.** ☐

**क्षेत्राचे नाव - संख्याज्ञान** **घटकाचे नाव - संख्यांचा चढता व उतरता क्रम**

**उपघटक - दोन अंकी संख्या लिहिताना आणि तुलना करताना स्थानिक किमतीचा उपयोग करतात.**

**दिवस - एकविसावा**

## थोडे आठवूया

❖ लहान संख्येला रिंगण ◯ कर.

५ , ८ | २ , ७ | १ , ९ | ७ , ५ | २ , ८

❖ मोठ्या संख्येला चौकट ☐ कर.

२ , ३ | ५ , ६ | ८ , ९ | ३ , ४ | ९ , १०

➢ **१८ , ४३ , २६ या संख्यांची नाणी नोटांच्या मदतीने मांडणी करूया.**



**१८ मध्ये १० रुपयाची एक नोट**



**४३ मध्ये १० रुपयाच्या ४ नोटा**



**२६ मध्ये १० रुपयाच्या दोन नोटा**

मग सर्वात लहान संख्या कोणती असेल ?

➢ जिच्यामध्ये दहाच्या नोटा म्हणजे दशकचा अंक लहान असेल ती संख्या लहान.

➢ १८, ४३, २६ मध्ये १८ चा दशक अंक लहान म्हणून १८ लहान .

